नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/03/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 28/02/2021 चे 22.00 वा. ते 22.30 वा. दरम्यान पुंडरेश उर्फ अंकीत पंडेश्वरी सिंग(जखमी), वय 40 वर्ष व फिर्यादी नामे– संकेत प्रेमशंकर तिवारी, वय 31 वर्ष, रा. वार्ड नं. 4 जे.एन.हॉस्पीटल कांद्री कन्हान, ता. पारशिवनी हे दोघेही हॉटेल मधुन आपल्या घरी परत जात होते. त्यादरम्यान गहुहिवरा ओव्हर ब्रिज कडुन टोलटॅक्स कडे जाणाऱ्या सर्विस रोडने ते दोघेही जात असता आरोपी 1) विधीत उर्फ मौसी पंजाबराव कोमटे, वय 23 वर्ष, रा. शिवनगर कन्हान, 2) सुवंश कुलदिपसिंग खंडुजे, वय 18 वर्ष, रा. शिवनगर कन्हान 4) लक्की अरविंद नाईक, वय 20 वर्ष, रा. अशोक नगर कन्हान व 16 वर्षीय विधीसंर्घषग्रस्त बालक यांनी बिअरची खाली बॉटल पुलावरून खाली फेकली असता जखमी व फिर्यादी हे दचकले व जखमी याने म्हटले की, ''किसने बॉटल फेका'' असे विचारले असता पुलावर्ती असलेल्या आरोपीतांनी म्हटले की "तु आगे आ हम बताते है, किसने बॉटल फेका है" असे म्हटले व काही अंतरावर पुलाच्या खाली येवुन संगणमत करून अशिलल शिवीगाळ देवुन चिडुन जावुन आरोपी विदीत उर्फ मौसी याने जखमी यास जिवानाशी ठार मारण्याचे उद्देशाने चाकुने पोटावर वार केले. यानंतर आरोपीतांनी जखमी यास हातबुक्यांनी मारहाण केली व फिर्यादी हा वाचविण्यास गेला असता त्याला सुध्दा दगळाने व हातबुक्याने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 307, 294, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. सतिश मेश्राम मो नं 9067176694 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर